नोटीस

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/१/कावि/९५/२०१९
दिनांक - १५/०१/२०१९

प्रति,
श्री.शिगांडे विलास तुकाराम
(सहा.शिक्षक)
माध्यमिक विद्यालय भोसरी

विषय - कार्यालयीन कामकाजात हस्तक्षेप केलेबाबत.....

२/-तुम्ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालय भोसरी येथे सहा.शिक्षक या महत्वाच्या व जबाबदारीच्या पदावर कामकाज करीत आहात. शिक्षक पदाच्या कर्तव्याची तुम्हांस माहिती असणे आवश्यक आहे. वरीष्ठांच्या सूचनांचे पालन करणे हे तुमचे प्रथम कर्तव्य आहे.

माध्य/शि/०४/कावि/६७१/२०१७ दि.१७/१०/२०१७ अन्वये तुम्हास एकाच पदावर १२ वर्ष वरिष्ठ वेतनश्रेणी चा लाभ दि.०८/०९/२०१५ पासुन देणेबाबत आदेश मा.अतिरिक्त आयुक्त सो. यांच्या मान्यतेने आदेश निर्गत करणेत आलेले आहेत.तुम्हास १२ वर्ष झालेली दि.०८/०९/२०१५ ही तारीख तुम्हास चुकीची वाटत असेल तर सदर आदेश मा.अतिरिक्त आयुक्त सो.यांच्या मान्यतेने दुरूस्ती होणे गरजेचे होते,तरी तुम्ही विद्यालयात दि.०६/०३/२०१८ पुर्वी १२ वर्षाची तुमची वेतननिश्चिती करताना विद्यालयाच्या कार्यालयातील लिपिक यांची वर्ग ०४ मधुन पदोन्नतीने लिपिक नेमणुक झालेली असल्याने त्यांना कामकाजाची जास्त माहीती झालेली नव्हती त्याचा तुम्ही गैरफायदा घेउन त्यांना चुकीची माहीती देउन चुकीची वेतननिश्चिती करून मुख्याध्यापक यांनाही तुम्ही चुकीची माहीती देउन वेतननिश्चिती करून घेतली.

तुम्ही विद्यालयातील विद्यार्थ्यांना अध्ययन करणेचे कामकाजात प्राध्यान्य देणे गरजेचे असताना, तुम्ही कार्यालयीन कामकाजात हस्तक्षेप करून विद्यालयाच्या व मुख्यकार्यलयाची आर्थीक दिशाभुल केलेचे दिसुन येत आहे. तुम्ही तुमची १२ वर्षाची वेतननिश्चिती करताना चुकीची करून एप्रिल-२०१८ पासुन जादा वेतन घेउन मनपाची आर्थीक फसवणुक केल्याचे तुमच्या वेतन बिलावरून दिसुन येत आहे.

या वरून तुम्ही प्रशासनाची आर्थीक फसवणुक केल्याचे निर्दशनास आलेले आहे,ही बाब अत्यंत गंभीर आहे.तरी सदरची नोटीस मिळाल्यापासुन ४८ तासात सविस्तर खुलासा सादर करणेत यावा. सदर खुलासा समाधानकारक नसल्यास तुमच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका कलम-५६(२)“ड”अन्वये प्रशासकीय कारवाई करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका